स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विघटनशील (ओल्या) कचऱ्यापासून तयार करण्यात येणाऱ्या कंपोस्ट खत (City Compost) निर्मितीला व वापराला चालना देण्यासाठी प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: स्वमअ-२०१९/प्र.क्र.२१२(१)/नवि-३४
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना:-

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी यशस्वीरित्या करून राज्याचा नागरी भाग दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी हागणदारी मुक्त घोषित करण्यात आला आहे. तसेच, शहरांतील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करून शहरे “स्वच्छ” करण्याची कार्यवाही सुरु आहे. स्वच्छ भारत अभियानातंर्गत कचऱ्याचे विलगीकरण करून त्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणे हा घनकचरा व्यवस्थापनाचा मुख्य गाभा आहे.

२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील शहरांमध्ये घनकचरा व्यवस्थापन करताना, शहरामधील विलगीकृत केलेल्या घनकचऱ्यापैकी विघटनशील (ओल्या) कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून तयार होणाऱ्या सेंद्रिय खताची विपणन व विक्री करण्यासाठी दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये “हरित महा सिटी कंपोस्ट” हा राज्य शासनाचा ब्रँड नोंदणीकृत करण्यात आला आहे.

३. आतापर्यंत बहुतांश शहरामध्ये घनकचऱ्यावर प्रक्रीया न करता तो डंपींग साईटवर डंप करण्यात येत होता. राज्यामध्ये विविध शहरांमध्ये घनकचरा साठवणुकीमुळे विविध समस्या निर्माण होत होत्या. या समस्येवर मात करण्याकरिता शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे निर्मितीच्या जागीच विलगीकरण करणे व विलगीकृत केलेल्या घनकचऱ्यापैकी विघटनशील (ओल्या) कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यास चालना / प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यामध्ये शहरातील विलगीकृत विघटनशील घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रीया करून त्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन मिळावे तसेच शेतकऱ्यांमार्फत या सेंद्रिय खताचा वापर मोठया प्रमाणावर व्हावा यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था शहरातील विलगीकृत केलेल्या ओल्या (विघटनशिल) कचऱ्यापासून कंपोस्ट निर्माण करतील अशा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना रुपये १,५००/- प्रती मेट्रिक टन ऐवढे प्रोत्साहन अनुदान खालील कार्यपध्दतीनुसार देण्यास शासन मान्यता देत आहे.

(१) कंपोस्ट खत निर्मितीसाठी वरील प्रमाणे देण्यात येणारे प्रोत्साहन प्राप्त करण्यासाठी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस राज्य शासनाने GIZ व NABARD यांनी विकसीत केलेल्या हरित ॲप मध्ये नोंदणी करून त्यावर आवश्यक माहिती भरावी लागेल.

१	शहरात दररोज निर्माण होणारा एकूण घनकचऱा (मे.टन)
२	शहरातील घनकचरा विलगीकरणाची टक्केवारी
३	त्यामधील -
	(i) सुका कचरा (मे.टन)
	(ii) ओला कचरा (मे.टन)
४	दररोज निर्माण होत असलेल्या एकूण विलगीकृत ओल्या कचऱ्यावरील प्रक्रीयेची टक्केवारी (कंपोस्ट खत निर्मितीसाठीची)
५	ओल्या कचऱ्यावर दररोज होत असलेल्या प्रक्रियेनंतर निर्माण होणारे कंपोस्ट खत (कमाल १५ टक्के) (मे.टन)
६	अशा प्रकारे दरमहा निर्माण होणारे कंपोस्ट खत (मे.टन)

(२) केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण पोर्टलवरील एमआयएस (MIS) चे प्रमाणीकरण(Validation) केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या त्रयस्त यंत्रणे मार्फत होत आहे. त्यामुळे, केंद्र शासनाच्या पोर्टलवरील एमआयएस मधील माहितीच्या आधारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सादर केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने एमआयएस व हरित ॲपव्दारे प्रमाणीकरण करून घेण्यात येईल.

(३) शहरातील ओल्या (विघटनशिल) कचऱ्यापासून तयार करण्यात आलेल्या कंपोस्ट खताची कृषी विभागाच्या प्रयोगशाळेतून दर तीन महिन्याने FCO नॉर्म नुसार तपासणी करणे अनिवार्य राहील.

(४) या कंपोस्ट खताची विपणन व विक्री करण्यासाठी “हरित महा सिटी कंपोस्ट” हा राज्य शासनाचा ब्रँड नोंदणीकृत मिळवावा लागेल.

(५) कंपोस्ट खत निर्मितीसाठी वरील प्रमाणे देण्यात येणारे प्रोत्साहन अनुदान वर्षातून एकदा देण्यात येईल.

(६) संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था कंपोस्ट खतासाठी प्रोत्साहन अनुदानाची मागणी ज्या वर्षासाठी करेल त्या वर्षासाठी संबंधित शहरास कचरा मुक्त शहरांच्या तारांकित मानांकनामध्ये किमान ३ स्टार मानांकन प्राप्त केले असले पाहिजे.

२. ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ ची अंमलबजावणी करून कचरामुक्त शहरांच्या तारांकित मानांकनात ३ स्टार दर्जा प्राप्त करतील अशाच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना, दिनांक १ जानेवारी, २०२० पासून शासनामार्फत देण्यात येणारी विवेकाधीन अनुदाने (discretionary grants) प्राधान्याने देण्याबाबत शासन विचार करील.

३. या बाबीसाठी येणारा खर्च नगर विकास विभागासाठी मंजूर केलेल्या नियतव्ययातून भागविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१७१५२७२०६४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradeep Patil

Digitally signed by Pradeep Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=05334a0514755cf2d85a6ca44c91e73cfa81323e994582a4a27e428d216ef701, cn=Pradeep Patil
Date: 2019.09.17 15:38:37 +05'30'

(प्रदिप पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा .मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा .राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
६. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई.
८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११. अधिदान व लेखाधिकारी, फोर्ट, मुंबई.
१२. अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे, मुंबई.
१३. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१४. मुख्य लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१५. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती सर्व
१६. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१७. निवडनस्ती, नवि-३४.